# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

## सरळसेवा भरती -२०१९

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र.ठामपा २११७/ प्र.क्र.६३/नवि-२३, दि.१८/०९/२०१७ अन्वये बारवी धरणाच्या प्रस्तावित वाढीव उंचीचा वापर केल्यास एकूण सहा गावे व पाच संलग्न पाडे विस्थापित होणार असून पाणी वापराच्या समन्यायी तत्वावर बारवी धरणाच्या प्रकल्पग्रस्तांना महामंडळाच्या सेवेत सामावून घ्यावयाचे असल्याने **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (विवयां), लिपीक टंकलेखक, लघुलेखक (निम्नश्रेणी), भूमापक, वाहनचालक (श्रेणी-२), तांत्रिक सहाय्यक (श्रेणी २), विजतंत्री (श्रेणी-२), जोडारी (श्रेणी-२), पंपचालक (श्रेणी-२), शिपाई व मदतनीस** इत्यादी रिक्त पदे भरण्यासाठी **केवळ जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांनी प्रमाणित केलेल्या पात्र उमेदवारांकडून** अर्ज मागविण्यात येत आहेत.

बारवीधरण प्रकल्पबाधित उमेदवारांमधून सरळसेवेद्वारे भरावयाच्या पदांची शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | सरळसेवेद्वारे भरावयाची शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) **(वर्ग-क)** | मान्यताप्राप्त तंत्रशिक्षण मंडळाची स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदविका किंवा तत्सम शैक्षणिक अर्हता जसे की, पार्ट टाइम डिप्लोमा इन सिव्हील इंजिनिअरींग. |
| २. | कनिष्ठ अभियंता (विवया) **(वर्ग-क)** | मान्यताप्राप्त तंत्रशिक्षण मंडळाची यांत्रिकी / विद्युत अभियांत्रिकी मधील पदविका किंवा तत्सम शैक्षणिक अर्हता जसे की, डिप्लोमा इन इलेक्ट्रिकल, डिप्लोमा इन मॅकेनिकल, डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक अँड टेलीकम्युनिकेशन, डिप्लोमा इन इन्स्ट्रुमेंटल इंजिनिअरींग, पार्ट टाइम डिप्लोमा इन इलेक्ट्रिकल, पार्ट टाइम डिप्लोमा इन मॅकेनिकल |
| ३. | लिपीक टंकलेखक **(वर्ग-क)** | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कोणत्याही शाखेची पदवी अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण.<br>२) राज्य शासनाची मराठी टंकलेखनाची ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखनाची ४० श.प्र.मि. वेगाची परिक्षा उत्तीर्ण.<br>३) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा शासनाच्या दि.०४/०२/२०१३ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद संगणक अर्हता उत्तीर्ण. |
| ४. | लघुलेखक (निम्नश्रेणी) **(वर्ग-क)** | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर<br>२) राज्य शासनाची मराठी लघुलेखनाची ८० श.प्र.मि. व मराठी आणि इंग्रजी टंकलेखनाची ४० श.प्र.मि. वेगाची परीक्षा उत्तीर्ण |
| ५. | भूमापक **(वर्ग-क)** | १) शासकीय किंवा शासन मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा भूमापक विषयाचा अभ्यासक्रम उत्तीर्ण<br>२) संगणक प्रणालीचा Auto Cad अभ्यासक्रम पूर्ण |
| ६. | वाहनचालक (श्रेणी-२) **(वर्ग-क)** | १) इयत्ता ७ वी उत्तीर्ण<br>२) हलके किंवा अवजड वाहन चालविण्याचा परवाना<br>३) परवाना मिळविल्यानंतर प्रत्यक्ष वाहन चालविण्याचा किमान २ वर्षाचा अनुभव. |
| ७. | तांत्रिक सहाय्यक (श्रेणी २) **(वर्ग-क)** | १) शासकीय किंवा शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची आरेखक स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत या विषयातील अभ्यासक्रम परीक्षा उत्तीर्ण किंवा शासकीय किंवा शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची स्थापत्य / अभियांत्रिकी बांधकाम निरिक्षक विषयाचा अभ्यासक्रम परीक्षा उत्तीर्ण. |

| | | |
|---|---|---|
| ८. | विजतंत्री (श्रेणी-२) **(वर्ग-क)** | १) शालांत परीक्षा उत्तीर्ण व शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्युत अभ्यासक्रम पूर्ण आणि<br>२) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनुज्ञापक मंडळाचे क्षमता प्रमाणपत्र धारक असणे आवश्यक. |
| ९. | जोडारी (श्रेणी-२) **(वर्ग-क)** | १) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाची शालांत परीक्षा उत्तीर्ण अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण<br>२) शासकीय किंवा शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची जोडारी अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र. |
| १०. | पंपचालक (श्रेणी-२) **(वर्ग-क)** | १) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाची शालांत परीक्षा उत्तीर्ण अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण<br>२) शासकीय किंवा शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची तारतंत्री या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र. |
| ११. | शिपाई **(वर्ग-ड)** | १) किमान ४ थी इयत्ता उत्तीर्ण<br>२) मराठी लिहीता, वाचता येणे आवश्यक |
| १२. | मदतनीस **(वर्ग-ड)** | १) किमान ४ थी इयत्ता उत्तीर्ण<br>२) मराठी लिहीता, वाचता येणे आवश्यक |

## नियुक्तीच्या अटी व शर्ती

**कमाल व किमान वयोमर्यादा:- (अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक ३०/०८/२०१९ रोजी)**

उमेदवारांची वयोमर्यादा किमान १८ वर्षे व कमाल ४५ वर्षे

**लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन :-**

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ च्या अधिसूचनेनुसार महामंडळाच्या सेवाप्रवेशासाठी लहान कुटूंबाचे नमुना-अ मधील प्रतिज्ञापन उमेदवाराने कागदपत्र पडताळणीवेळी सादर करणे बंधनकारक राहील.

**मराठी भाषेचे ज्ञान :-** उमेदवाराला मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक राहील.

**लेखी परीक्षेचे स्वरुप :**

वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील पदांकरीता लेखी परीक्षा १०० गुणांची घेण्यात येणार असून, लघुलेखक (उच्च श्रेणी) व वाहन चालक पदाकरीता ५० गुणांची व्यावसायिक परीक्षा घेण्यात येईल.

| अ.क्र. | पदाचे नाव | लेखी परीक्षा | व्यावसायिक परीक्षा |
|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | १०० गुण | -- |
| २. | कनिष्ठ अभियंता (विवयां) | १०० गुण | -- |
| ३. | लिपीक टंकलेखक | १०० गुण | -- |
| ४. | लघुलखेक (निम्न श्रेणी) | १०० गुण | लघुलेखक परीक्षा ५० गुण |
| ५. | भूमापक | १०० गुण | -- |
| ६. | तांत्रिक सहाय्यक (श्रेणी-२) | १०० गुण | -- |
| ७. | पंपचालक (श्रेणी-२) | १०० गुण | -- |
| ८. | जोडारी (श्रेणी-२) | १०० गुण | -- |
| ९. | विजतंत्री (श्रेणी-२) | १०० गुण | -- |
| १०. | वाहनचालक (श्रेणी-२) | १०० गुण | वाहनचालन परीक्षा ५० गुण |
| ११. | शिपाई | १०० गुण | -- |
| १२. | मदतनीस | १०० गुण | -- |

## परीक्षेचे स्वरुप

| अ. क्र. | पदाचे नाव | भाग-१ इंग्रजी | भाग-२ मराठी | भाग-३ सामान्य ज्ञान | भाग-४ तर्क क्षमता | एकूण प्रश्न | एकूण गुण | परीक्षेचे स्वरुप | परीक्षेचा कालावधी (मिनीटे) | व्यावसायिक परीक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | | | | | |
| १. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | १० | १० | १५ | १५ | ५० | १०० | लेखी | ६० मि. | - |
| २. | कनिष्ठ अभियंता (विवयां) | १० | १० | १५ | १५ | ५० | १०० | लेखी | ६० मि. | - |
| ३. | लघुलेखक (निम्न श्रेणी) | १० | १० | १५ | १५ | ५० | १०० | लेखी | ६० मि. | लघुलेखन परीक्षा |
| ४. | लिपीक टंकलेखक | १० | १० | १५ | १५ | ५० | १०० | लेखी | ६० मि. | - |
| ५. | भूमापक | १० | १० | १५ | १५ | ५० | १०० | लेखी | ६० मि. | - |
| ६. | तांत्रिक सहाय्यक (श्रेणी-२) | १० | १० | १५ | १५ | ५० | १०० | लेखी | ६० मि. | - |
| ७. | जोडारी (श्रेणी-२) | १० | १० | १५ | १५ | ५० | १०० | लेखी | ६० मि. | - |
| ८. | पंपचालक (श्रेणी-२) | १० | १० | १५ | १५ | ५० | १०० | लेखी | ६० मि. | - |
| ९. | विजतंत्री (श्रेणी-२) | १० | १० | १५ | १५ | ५० | १०० | लेखी | ६० मि. | - |
| १०. | वाहनचालक (श्रेणी-२) | १० | १० | १५ | १५ | ५० | १०० | लेखी | ६० मि. | वाहनचालन परीक्षा |
| ११. | शिपाई | १० | १० | १५ | १५ | ५० | १०० | लेखी | ६० मि. | - |
| १२. | मदतनीस | १० | १० | १५ | १५ | ५० | १०० | लेखी | ६० मि. | - |

## ऑनलाईन अर्ज करण्याचे वेळापत्रक:-

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १ | अर्ज ऑनलाईन नोंदणी (रजिस्ट्रेशन) करण्याचा कलावधी | दि. १९/०८/२०१९ सायंकाळी ६.०० वाजलेपासून | दि. ३०/०८/२०१९ रात्री ११.५९ वाजेपर्यंत |
| २ | परीक्षेचा दिनांक व वेळ | परीक्षेची तारीख व वेळ वेळोवेळी म.औ.वि.महामंडळाच्या www.midcindia.org व महा परीक्षा पोर्टल यांच्या www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येईल. | |

| अर्ज भरण्याची कार्यपद्धती आणि सुचना :- | |
|---|---|
| १) | उमेदवाराला www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर लॉगइन करावे लागेल. उमेदवाराने आपल्या उजव्या बाजूला असलेल्या 'सूचना' या पर्यायावर क्लिक करावे. तिथून उमेदवाराला थेट नोंदणीच्या पोर्टलवर नेले जाईल. पहिल्यांदाच नोंदणी केली जात असल्यास उमेदवाराने नोंदणीच्या पर्यायावर क्लिक करून यूजर नेम, पासवर्ड आणि इमेल आयडी टाकावा. उमेदवाराला त्यानंतर त्याच्या/तिच्या प्रमाणित इमेल आयडीवर सक्रीयतेची लिंक मिळेल जी त्यांच्या साइनअपशी संबंधित असेल. उमेदवाराने त्याचे/तिचे खाते सक्रीय करण्यासाठी त्याच्या/तिच्या इमेल आयडीवर मिळालेल्या सक्रीयतेच्या लिंकवर क्लिक करावे. .( Activation लिंक ही २ दिवसांकरिता activate असेल.). उमेदवाराने त्याची/तिची लॉगइनची माहिती गोपनीय ठेवावी. एकदा खाते सक्रीय झाले की, उमेदवाराला त्यांच्या नोंदणी पोर्टलचे युजरनेम आणि पासवर्ड वापरून केव्हाही लॉग ऑन होता येईल<br>टीप : USERNAME आणि PASSWORD जतन करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल. |
| २) | उमेदवाराचे नाव, वडीलांचे, पतीचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल. |
| ३) | छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती - कृपया उंची आणि रुंदी प्रत्येकी २०० pixel असलेले छायाचित्र स्कॅन करुन अपलोड करा आणि अर्जामध्ये अपलोड करा. प्रतिमेची उंची ६० पिक्सल आणि रुंदी १४० पिक्सल असावी. प्रतिमेचे आकारमान ३ KB ते ५० KB च्या दरम्यान असावे. (टिप :- उमेदवाराने अलीकडील छायाचित्र (फोटोग्राफ) अपलोड करणे आवश्यक आहे .) |
| ४) | पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरुपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ.सहित माहिती भरावी. |
| ५) | त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल. असल्यास ड्रॉपडाऊन मधून त्याने / तिने आपला जात प्रवर्ग निवडावा.<br>उमेदवाराने आपल्या जात प्रवर्गाची निवड करण्याआधी जाहिरात वाचणे अपेक्षित आहे. ऑनलाईन पद्धतीने आवेदन अर्ज भरण्यापुर्वी उमेदवाराने विस्तृत जाहिरातींचे काळजीपूर्वक वाचन करावे. जाहिरातीतील सूचना पूर्णपणे वाचूनच ऑनलाईन अर्ज भरण्याची दक्षता उमेदवारांनी स्वतः घ्यावी. |
| ६) | ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी, तसेच उमेदवाराने आधार क्रमांक/ आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती द्यावी . |
| ७) | तसेच मराठी भाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य, अपंगत्वाचा प्रकार (लागू असल्यास) यासंबंधीची माहिती द्यावी लागेल.<br>उमेदवारास आपण बारवी धरण प्रकल्पग्रस्त आहे काय? असल्यास जाहिरातीमध्ये नमूद केलेली बारवी धरण प्रकल्पग्रस्तांसाठी असलेली अर्हता पूर्ण करत आहे काय? यासंबंधीची माहिती द्यावी लागेल. यासोबतच उमेदवारास त्याच्या गावाचे नाव, घर क्रमांक, अवॉर्ड नंबर यासंबंधीची माहिती द्यावी लागेल. |
| ८) | शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेमध्ये जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे, तरच आपणास त्या पदासाठी अर्ज करता येईल. |
| ९) | एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केले की अर्जदार पुढे या बटणावर क्लिक करावे लागेल, त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदाराकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशील संपादित करण्याची परवानगी दिली जाणार नाही. |

१०) आता उमेदवारास पदाची निवड करावी लागेल.

उमेदवार एकाच अर्जामध्ये पात्र असलेल्या (जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक पात्रता, वयाची अर्हता आणि अन्य अर्हता विचारात घेऊन) पदांपैकी केवळ एका पदाची निवड करू शकतो.

| Sr.No | Post Name in English | Post Name in Marathi |
|---|---|---|
| 1 | Clerk Typist | लिपिक टंकलेखक |
| 2 | Steno (Lower Grade) | लघुलेखक (निम्न श्रेणी) |
| 3 | Surveyor | भूमापक |
| 4 | Driver (Grade-II) | वाहनचालक (श्रेणी-2) |
| 5 | Junior Engineer (Civil) | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) |
| 6 | Junior Engineer (E&M) | कनिष्ठ अभियंता (विवयां ) |
| 7 | Technical Assistant (Grade-II) | तांत्रिक सहाय्यक (श्रेणी-2) |
| 8 | Electrician (Grade-II) | विजतंत्री (श्रेणी-2) |
| 9 | Fitter (Grade -II) | जोडारी (श्रेणी-2) |
| 10 | Pump Operator (Grade -II) | पंपचालक (श्रेणी-2) |
| 11 | Peon | शिपाई |
| 12 | Helper | मदतनीस |

११) त्यानंतर उमेदवारास सर्व पदांसाठी आवश्यक असलेली पात्रतेबद्दलची माहिती देऊन ती सेव्ह करणे आवश्यक आहे.

१२) उमेदवाराची परीक्षा फक्त ठाणे जिल्ह्यामध्ये घेतली जाईल.

१४) ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेस मध्यरात्री ११.५९PM वाजल्यानंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल.

१५) जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉगिन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची पहिली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे हॉल तिकीट, परीक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रक्रियांसाठी विचारात घेण्यात येईल, कोणत्याही डुप्लीकेट नोंदणीस अवैध नोंदणी मानले जाईल उमेदवाराद्वारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची माहिती देण्यात आली असेल तर कृपया या विषयाबद्दलची योग्य प्रक्रिया जाणून घेण्यासाठी enquiry@mahapariksha.gov.in वर लिहा किंवा टोल फ्री नंबर १८००३०००७७६६ वर कॉल करा.

**नोंद** :- नोंदणी मधील तपशील जसे की वापरकर्ता नाव (USERNAME), ई मेल आयडी, प्रवर्ग आरक्षण (लागू, समांतर किंवा प्रवर्ग आरक्षण) , निवडलेले पद , जन्मतारीख, उमेदवाराचे छायाचित्र (फोटोग्राफ) आणि स्वाक्षरी, शैक्षणिक पात्रतेचा तपशील इत्यादी फॉर्म सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही.

**अर्जातील माहितीचे पूर्वावलोकन:-**

१) युजरनेम आणि पासवर्ड वापरुन लॉगइन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो.

२) अर्ज प्रिंट करण्यासाठी **"प्रिंट प्रिव्हयू"** या पर्यायावर क्लिक करा.

नोंद:उमेदवाराने आपला PDF स्वरूपातील अर्ज, परीक्षा प्रवेश पत्र संपूर्ण भरती प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत स्वत: जवळ ठेवावा.

**महत्त्वाच्या सूचना:**

1)उमेदवारास देण्यात आलेले परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थितीमध्ये बदलण्यात येणार नाही.

2) परीक्षा केंद्र किंवा परीक्षा शहर बदलण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीमध्ये (वैद्यकीय कारणांसाठी सुद्धा किंवा इतर कारणांसाठी) स्वीकारली जाणार नाही. उमेदवाराने त्याची प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी.

३) उमेदवाराने फक्त एकदाच अर्ज करावा, जर एका उमेदवाराने एकापेक्षा अधिक अर्ज केलेलं आहेत असे आढळून आले तर अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द केली जाईल.

**महत्वाच्या सूचनाः-**

१) केवळ जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांनी प्रमाणित केलेल्या पात्र उमेदवारांनी महापरीक्षा पोर्टल यांच्या www.mahapariksha.org.in या संकतेस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावा.

२) प्राप्त अर्जांची छाननी झालेनंतर उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यात येईल, लेखी परीक्षेची तारीख व वेळ संबंधित उमेदवारांना स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

३) उमेदवारांनी अर्ज सादर करतेवेळी त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile number) व ईमेल आयडी ही माहिती बिनचूक भरणे आवश्यक आहे. भरतीप्रक्रिये संबंधित सर्व माहिती जसे की, ओळखपत्र, परीक्षेची तारीख व वेळ इत्यादी माहिती संबंधित उमेदवारांना त्यांनी अर्जामध्ये नमूद केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर व ईमेल वर पाठविण्यात येईल.

४) खालील मूळ प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती (Attested Copy) छाननी करतेवेळी सादर करणे आवश्यक आहे.

अ) शैक्षणिक / तांत्रिक / व्यावसायिक अर्हता प्राप्त केलेली प्रमाणपत्रे / गुणपत्रिका.

ब) वयाचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्म दाखला.

क) बारवी प्रकल्पबाधित असलेले सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र.

ड) लहान कुटुंब असल्याचे व अर्जात भरलेली माहिती खरी असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापन.

इ) याशिवाय उमेदवाराला जे-जे- लागू होते त्या-त्या दाखल्यांची प्रती इ.

५) उमेदवाराने अर्ज सादर करण्यापूर्वी तो संबंधित पदाची अर्हता पूर्ण करतो की नाही याची खात्री करावी. उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव / राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकिची माहिती दिल्याचे तसेच प्रमाणपत्रे / कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निर्दशनास आल्यास त्याची / तिची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती रद्द / सेवा समाप्त करण्यात येईल.

६) अर्जासोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील छोट्या कुटुंबाचे व अर्जातील माहिती खरी असल्याचे प्रतिज्ञापन उमेदवाराने सादर करणे बंधनकारक आहे.

७) बारवी धरणाचा तिसरा व अंतिम टप्पा पुर्ण केल्यानंतर प्रस्तावित वाढीव उंचीचा वापर केल्यास एकुण सहा गावे व पाच संलग्न पाडे विस्थापीत होणार असून पाणी वापराच्या समन्यायी तत्वावर बारवी धरणाच्या प्रकल्पग्रस्तांना महामंडळाच्या सेवेत सामावून घ्यावयाचे आहेत. सबब, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांनी मौजे काचकोली, कोळेवडखळ, मानिवली (पाडा) शिरवली, मोहघर, सुकाळवाडी, तोंडली या गावातील पात्र उमेदवारांच्या यादीमधील उमेदवार अर्ज करु शकतात.

८) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-१११४/प्र.क्र.२००/१६-अ, दि.०४/०९/२०१५ मध्ये नमूद केल्यानुसार प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, स्वातंत्र सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी व पदविधर / पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी या सर्व घटकातील उमेदवारांना जर त्यांना लिपीक टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाली, तर टंकलेखकनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिने असलेली मुदत वाढवून २ वर्षे इतकी करण्यात आली आहे.

९) उक्त उमेदवारांनी अर्ज सादर केलेनंतर दुसऱ्या टप्प्यामध्ये संबंधित उमेदवारांचे शैक्षणिक प्रमाणपत्रे व इतर आवश्यक कागदपत्रांची छाननी करणेत येईल. सदर छाननीअंती पात्र उमेदवार लेखी परीक्षेस पात्र ठरतील.

१०) सदर भरतीकरीता अर्ज सादर करतेवेळी गावाचे नाव, घर क्रमांक व अवार्ड क्रमांकाची माहिती संबंधित उमेदवाराकडे असणे अनिवार्य आहे.

११) निवड समितीने सर्वसाधारण गुणवत्ता यादीचे आधारे रिक्त पदांच्या अनुषंगाने निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्यात येऊन ती महामंडळाच्या www.midcindia.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करताना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. १२१६/(प्र.क्र.६५/१६) १३-अ, दिनांक १३/०६/२०१८ मधील अनुक्रमांक १२ चे अनुषंगाने करणेत येईल.

१२) निवड झालेल्या उमेदवारांना महामंडळाच्या राज्यातील कोणत्याही कार्यालयात नेमणूका देण्यात येतील.

१३) निवड झालेल्या उमेदवारांना महामंडळाचे नियम बंधनकारक आहे. तसेच महामंडळाच्या सेवा विनिमयात नमूद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक राहील.

**१४) सदर पदे महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र. ठामपा-२११७/प्र.क्र.६३/नवि-२३, दि.१८/०९/२०१७ च्या अनुषंगाने भरणेत येत असल्याने सदर पदे अधिसंख्य पदे म्हणून परिगणना करण्यात येणार आहेत. सदर पदावरील व्यक्ती सेवानिवृत्त झाल्यास अथवा कोणत्याही कारणास्तव सेवा देण्यास सक्षम न ठरल्यास (मृत्यू, बडतर्फी, सेवा सोडून जाणे इ.) सदर पदे आपोआप व्यपगत होईल.**

१५) सदर भरतीप्रक्रिया पूर्णतः वा अंशतः रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकारी महामंडळ राखून ठेवत आहे.

**महाव्यवस्थापक (मनुष्यबळ विकास)**
**मऔविम, मुंबई-९३.**

# <u>उमेदवारांने करावयाचे प्रतिज्ञापन</u>

१) मला एक पेक्षा अधिक पती / पत्नी / नाही किंवा माझे अद्याप लग्न झालेले नाही. (नको असेल ते खोडावे)
२) माझेवर कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नाही किंवा फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावलेली नाही किंवा शिस्तभंगाची कारवाई झाली नाही किंवा चालू नाही.
३) मला स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा कोणत्याही सरकारच्या सेवेतून बडतर्फ / काढून टाकण्यात आले नाही. (कोणत्याही स्थानिक प्राधिकरणात आतापर्यंत सेवेत नसल्यास तसे नमूद करावे..............................)

मी------------------------------- असे प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खरी व सत्य आहे. त्या पृष्ठयर्थ मी, प्रमाणपत्राच्या सत्यप्रती सादर करीत आहे. मी आणखी असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी आढळून आल्यास, माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई होईल. तसेच या माहितीच्या आधारे होणारी शिफारस किंवा नियुक्ती रद्द होईल याची मला पूर्ण जाणीव आहे. त्यासंबंधी महामंडळाच्या निवड समितीचा अथवा नियुक्ती प्राधिकरण यांचा निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील. त्याबद्दल मी नोकरी गमावण्यास बंधनकारक राहील व त्यासंबधी माझी कोणतीही तक्रार असणार नाही.

ठिकाण :- आपला विश्वासू,

दिनांक :-

(अर्जदाराची स्वाक्षरी)

टिप :-

- वर नमूद केलेल्या लागू असणाऱ्या सर्व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात. नको असेल ते खोडावे.
- अर्जातील सर्व तपशिल अचुक लिहिणे आवश्यक आहे. अर्ज अपूर्ण लिहिल्यामुळे आपला अर्ज अपात्र ठरवल्यास, त्याची जबाबदारी हे कार्यालय स्विकारणार नाही. आवश्यक कागदपत्रांव्यतिरिक्त अन्य कोणतेही कागदपत्र जोडू नयेत.

-----------------------------------------********************-------------------------------

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाबाबतचे प्रतिज्ञापन) नियम २००५ च्या अधिसूचनेनुसार**

**प्रतिज्ञापन**

नमुना-अ
(नियम ४ पहा)

मी, श्री / श्रीमती / कुमारी.------------------------------------------------------------ श्री.------------------- ------------------------------- यांचा/यांची मुलगा/मुलगी/ पत्नी, वय----------- वर्षे, राहणार------------------------------------- ---------------------------------------------------------------------- याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो / करते की,

१) मी------------------------------------ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला -------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या--------- आहे. (असल्यास, जन्म दिनांक नमूद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल यांची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी
(अर्जदारांचे नाव)

**बारवी धरणाची उंची वाढविल्यामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पबाधितांना पाण्याच्या वापराच्या समन्यायी पध्दतीने संबंधित आस्थापनेवर नेमणूकीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- ठामपा-२११७/प्र.क्र.६३/नवि-२३**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,
दिनांक :- १८ सप्टेंबर, २०१७

**प्रस्तावना :** -

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वागळे इस्टेट, डोंबिवली, कल्याण, भिवंडी, टी.टी.सी., तळोजा, अंबरनाथ, बदलापूर या औद्योगिक क्षेत्रास व विविध स्थानिक स्वराज्य संस्था यांना पाणी पुरवठा करण्यासाठी बारवी नदीवर पिंपळोली, तालुका-अंबरनाथ, जि.ठाणे येथे सन १९७२ मध्ये बारवी धरण बांधण्यात आले. पहिल्या टप्प्यात एकुण साठवण क्षमता १३०.४० द.ल.घ.मी. (३५६ द.ल.लि. प्रति दिन) धरणाचा दुसरा टप्पा सन १९८६ मध्ये पुर्ण झाला. तसेच दुसऱ्या टप्प्यामुळे धरणाची पाणी साठवण क्षमता १७८.२६ द.ल.घ.मी. (४८६ द.ल.लि. प्रति दिन) इतकी होती. धरणाचा तिसरा टप्पा सन १९९८ मध्ये हाती घेण्यात आला व सन २०१६ मध्ये सांडव्यापर्यंत (दरवाजे बंद न करता) पाणीसाठा २३४.७१ द.ल.घ.मी. (६४३ द.ल.लि. प्रति दिन) इतका झाला असून धरणाचा तिसरा व अंतिम टप्पा पुर्ण केल्यानंतर (दरवाजे बंद केल्यानंतर) ३४०.४८ द.ल.घ.मी. (९३२ द.ल.लि. प्रति दिन) असा होणार आहे.

सद्यस्थितीत धरणाची उंची ६८.६० मी. असून धरणाची पाणी साठवण क्षमता २३४.७१ द.ल.घ.मी. आहे. सद्यस्थितीतील धरणावर १२ स्तंभ उभारुन त्यावर स्वयंचलित दरवाजांची उभारणी केल्यानंतर उक्त उंची ७२.६० मी. होणार असुन साठवण क्षमता ३४०.४८ द.ल.घ.मी. (९३२ द.ल.लि.) होणार आहे.

बारवी धरणाच्या प्रस्तावित वाढीव उंचीचा वापर केल्यास एकुण सहा गावे व पाच संलग्न पाडे विस्थापित होणार असून व या विस्थापितांचे पुनर्वसनाचे काम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सुरु असुन त्यांचेकडुन प्राप्त प्राथमिक माहितीनुसार विस्थापित झालेल्या कुटुंबांची संख्या ११६३ इतकी आहे.

बारवी धरणाच्या बुडीत क्षेत्रातील गावठाणातील ग्रामस्थांच्या संघटनेतर्फे काही मागण्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ विभागाकडे सादर करण्यात आल्या असुन त्यापैकी प्रकल्पग्रस्तांच्या कुटुंबातील एका व्यक्तीस नोकरी मिळणे या मागणीचा समावेश आहे.

बारवी प्रकल्पबाधितांच्या उक्त मागणीच्या अनुषंगाने बारवी धरणातून उपलब्ध पाण्याच्या वापराच्या समन्यायी तत्वावर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आस्थापनेवर सामावून घेणेकरीता मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १०.०८.२०१६ रोजी बैठक घेण्यात आली. उक्त बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांनी बारवी धरण प्रकल्पग्रस्तांना बारवी धरणातील पाणी वापराच्या समन्यायी तत्त्वानुसार आस्थापनेवर सामावून घेणेकरीता धोरण निश्चित करण्याचे निर्देश दिले.

तद्नुषंगाने मा.मंत्री मंडळाच्या २९.०८.२०१७ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार बारवी धरणग्रस्तांना संबंधित महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि नगरपालिका/ महापालिकांच्या सेवेत सामावून घेणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

**<u>शासन निर्णय:-</u>**

बारवी धरणाची उंची वाढविल्याने उपलब्ध होणाऱ्या अतिरीक्त पाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व ठाणे, मिरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, उल्हासनगर या महानगरपालिका व अंबरनाथ या नगरपालिकेला उपलब्ध होणार आहे. या अतिरिक्त ४४६ द.ल.लि. पाण्याचा वापर करणाऱ्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि ठाणे, मिरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, उल्हासनगर या महानगरपालिका व अंबरनाथ नगरपालिका या ६ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अतिरिक्त पाणी वापराच्या समन्यायी तत्वावर त्यांच्या आस्थापनेवर बारवी धरणाच्या प्रकल्प ग्रस्तांना सेवेत सामावुन घेण्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

(१) बारवी धरणाच्या वाढलेल्या उंचीमुळे प्राप्त अतिरिक्त ४४६ द.ल.लि. पाण्याचा वापर करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अतिरिक्त पाणी वापराच्या समन्यायी तत्वावर सेवेत सामावून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(२) जिल्हाधिकारी, ठाणे यांनी अंतिम केलेल्या बारवी धरण प्रकल्पग्रस्तांच्या विहित करण्यात आलेले ५% आरक्षण व भुकंपग्रस्तांसाठी विहित करण्यात आलेले २% आरक्षण असे एकुण ७% आरक्षणाच्या मर्यादेत बारवी धरणग्रस्तांमुळे बाधित झालेल्या कुटुंबातील एका व्यक्तीस संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या सेवेत विहीत पध्दतीने सामावून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(३) जिल्हाधिकारी, ठाणे यांनी अंतिम केलेल्या बारवी धरण प्रकल्पग्रस्तांना आरक्षित ७% पदांच्या मर्यादेत सामावून घेणे करीता पदे उपलब्ध नसल्यास अथवा कमी पडत असल्यास गट “क” व गट “ड” मधील आवश्यक अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर व्यक्ती सेवानिवृत्त झाल्यास अथवा कोणत्याही कारणास्तव सेवा देण्यास सक्षम न ठरल्यास (मृत्यु, बडतर्फी, सेवा सोडुन जाणे, इ.) सदर पदे आपोआप व्यपगत होईल.

तसेच या अधिसंख्य पदांचा खर्च संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने करणे आवश्यक आहे. या प्रयोजनाकरीता निर्माण केलेल्या पदांना ३५% आस्थापना खर्चाची मर्यादा शिथिल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(४) अधिसंख्य म्हणुन निर्माण करण्यात येणारी पदे फक्त बारवी प्रकल्पग्रस्तांमधूनच भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(५) सदर पदे सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार विहित मार्गाने / माध्यमातून भरण्यास मान्यता देत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१८१६३४५७८६२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

**(अजित म.कवडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव,
३) मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा, यांचे खाजगी सचिव,
४) मा.मंत्री, वित्त व नियोजन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा.मंत्री, उद्योग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा.पालकमंत्री, ठाणे जिल्हा यांचे खाजगी सचिव
८) अपर मुख्य सचिव, पुर्नवसन विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव, वित्त व नियोजन, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
११) अपर मुख्य सचिव, उद्योग व उर्जा विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव, महसुल विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव (नवि-१) नगर विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१४) प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१५) जिल्हाधिकारी, ठाणे
१६) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
१७) आयुक्त, ठाणे, मिरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, उल्हासनगर महानगरपालिका
१८) मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद
१९) निवड नस्ती, नवि-२३.